रे. क. नं. १८४/२०११

नि. ५७/क लगत

**<u>उलटतपास वादी साक्षीदार क्र. १ यांचा प्रतिवादी नं. १, ३ व ४ यांचेतर्फे वकील व्ही. बी. पाटील यांचेमार्फत</u>**

१८. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकती छाया बाळासो ऐतवडे यांनी पायगोंडा सिदगोंडा पाटील, रा. नागांव यांचेकडून खरेदी घेतलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं. २ यांनी वाद मिळकतीवर कर्ज घेतलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, कर्जफेडीसाठी दावा मिळकती खरेदी करणेबाबत प्रतिवादी नं. २ यांनी प्रतिवादी नं. १ यांना विचारणा केली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं. २ यांनी नोटरी यांचेकडे दावा मिळकतीसंदर्भात संचकारपत्र प्रतिवादी नं. १ यांच्या लाभात करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर संचकारपत्रास मी व आमची मुले अभिजीत आणि राहुल यांनी संमती दिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीपत्र करु न दिल्याने प्रतिवादी नं. १ यांनी दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, कोल्हापूर यांचेकडे खरेदीखत करुन मिळणेकरीता प्रतिवादी नं. २ यांचेविरुध्द स्पे.क.नं. ३०१/२०१० दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर स्पे.क.नं. ३०१/२०१० कामी प्रतिवादी नं. १ व २ यांचेमध्ये तडजोड झाली. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा तडजोड हुकूमनामा मान्य नसलेबाबत वरीष्ठ न्यायालयात अपील दाखल केलेले नाही.

१९. हे म्हणणे खरे आहे की, तडजोड हुकूमनाम्याप्रमाणे दिनांक १८/१२/२०१० रोजी प्रतिवादी नं. २ यांनी प्रतिवादी नं. १ यांचे लाभात दावा मिळकतीपैकी गट नं. १५५ मधील ७६ आर क्षेत्र चर्तुसिमापुर्वक नमुद करुन रजिस्टर खरेदीदस्त क्र. ७८०३/२०१० अन्वये खरेदीपत्र करुन दिले. हे म्हणणे खरे आहे की, सदर रजिस्टर दस्तास आमची मुले अभिजीत, राहुल आणि शिल्पा यांनी मान्यता दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीपत्राने दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादी नं. १ यांना दिला. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर दिनांक २१/१२/२०१० रोजी प्रतिवादी नं. २ यांनी प्रतिवादी नं. १ यांचे लाभात दावा मिळकतीपैकी गट नं. १५४ मधील ३ आर क्षेत्र चर्तुसिमापुर्वक नमुद करुन रजिस्टर खरेदीदस्त क्र. ७८४२/२०१० अन्वये खरेदीपत्र करुन दिले. हे म्हणणे खरे आहे की, सदर रजिस्टर दस्तास आमची मुले अभिजीत, राहुल आणि शिल्पा यांनी मान्यता दिलेली आहे.

२०. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीपत्रान्वये प्रतिवादी नं. १ हे मालक व वहिवाट झाल्याने ७/१२ पत्रकी त्यांच्या नावाची नोंद व्हावी म्हणून त्यांनी अर्ज दिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर अर्जास मी तक्रार घेतलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, मंडल अधिकारी यांनी माझी हरकत नामंजूर करुन प्रतिवादी नं. १ यांचा अर्ज मंजूर केला व प्रतिवादी नं. १ यांच्या नावाची नोंद ७/१२ पत्रकी झाली. हे म्हणणे खरे आहे की, सदर मंडल अधिकारी यांच्या

आदेशाविरुध्द मी उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी यांचेकडे अपील क्र. २०६/२०११ आणि २०७/२०११ दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन्ही अपीले उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी यांनी सबळ पुरावा दिला नाही या कारणास्तव नामंजूर केली. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी सदर आदेशाविरुध्द अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे अपील दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी खालील दोन्ही न्यायालयांचा आदेश कायम करुन माझी दोन्ही अपीले नामंजूर केली. हे म्हणणे खरे नाही की, अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे आदेशाविरुध्द मी वरीष्ठ न्यायालयात अपील केलेले नाही. सदरची अपीले सुनावणी करीता प्रलंबित होती व त्यानंतर ती नामंजूर करणेत आलेली आहेत.

प्रश्न — कमिनशर, पुणे यांच्या आदेशाविरुध्द अपील दाखल केले आहे काय?

उत्तर – हा दावा प्रलंबित असलेने पुढे अपील केले नाही.

२१. प्रतिवादी नं. १ यांच्या लाभात करुन दिलेले खरेदीखत रद्द करुन मिळणेकरीता मी या दिवाणी न्यायालयात तसेच अन्य दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्याच्या कामी खरेदीखत रद्द करुन मिळणेची मागणी केलेली नाही.

२२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ३०/०१/२०१२ रोजीचे रजिस्टर दस्त क्र. १३३१/२०१२ अन्वये प्रतिवादी नं. १ यांनी दावा मिळकतीचे खरेदीखत प्रतिवादी नं. ३ व ४ यांच्या लाभात करुन दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीदस्ताप्रमाणे प्रतिवादी नं. ३ व ४ यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी झालेली आहे. प्रतिवादी नं. २ व ३ यांच्या लाभात करुन दिलेले खरेदीखत रद्द करुन मिळणेकरीता मी या दिवाणी न्यायालयात तसेच अन्य दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला नाही.

२३. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं. १ व २ यांच्यात झालेली तडजोड ही मला सन २०१० सालीच समजलेली आहे. प्रतिवादी नं. २ ही माझी पत्नी आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं. १ व २ यांच्यात दावा मिळकतीसंदर्भात दावा प्रलंबित नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नं. १ हे खरेदीपत्राप्रमाणे दावा मिळकतीचे मालक व कब्जेवहिवाट झाले. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीत माझा हक्क व हितसंबंध आहे असा दर्शविणारा न्यायालयाचे हक्कज्ञापन मी प्राप्त केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं. ३ व ४ यांची दावा मिळकतीत आजही कब्जेवहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नं. १, ३ व ४ यांना नाहक त्रास देणेसाठी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**<u>उलटतपास वादी साक्षीदार क्र. १ यांचा प्रतिवादी नं. २ यांचेतर्फे वकील ए. एस. मिसाळ यांचेमार्फत</u>**

प्रतिवादी नं. २ व त्यांचे वकीलांचा वारंवार पुकारा करता गैरहजर. सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Sd/-

दि. १६-०३-२०२६

( जे. एन. भस्मे )

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर

पेठवडगांव